लोकमत

# मतदार जागृतीसाठी उद्या सायकल रॅली

कोल्हापूर : मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत उद्या, बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालय व शिवाजी विद्यापीठाच्यावतीने मतदार जागृती सायकल रॅली आयोजित केली आहे. सकाळी ९ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारत येथून रॅलीला सुरुवात होईल अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे यांनी दिली आहे. सायकल रॅलीचा मार्ग- शिवाजी विद्यापीठ  बहिस्थ शिक्षण (डिटन्स लर्निंग) इमारत पासून सुरुवात ते सायबर चौक ते माऊली चौक त्यानंतर सम्राट नगर त्यानंतर एनसीसी भवन शिवाजी विदयापीठ गेट असा असेल.

पुढारी

# विद्यापीठास १४ नोव्हेंबरला निवडणुकीमुळे सुट्टी जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकांसाठी सोमवारी (दि. १४) विद्यापीठ क्षेत्रातील ३३ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. त्यामुळे सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संलग्नित शिक्षण संस्था व विद्यापीठातील पदव्युत्तर अधिविभागांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

निवडणुकीसाठीतीन जिल्ह्यांतील ३३ महाविद्यालयांत मतदान केंद्रे आहेत. अन्य महाविद्यालयांतील शिक्षक, प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी व शिक्षकेतर कर्मचारी यांना मतदान करावे लागणार असल्याने सुट्टी जाहीर केल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात स्तुती कार्यक्रमाचा समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग प्रायोजित अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण प्रशिक्षण कार्यशाळा (स्तुती) शिवाजी विद्यापीठातील सैफ डीएसटी-सीएफसी विभागात दि. १ ते ७ नोव्हेंबर या कालावधीमध्ये घेण्यात आली. स्टार्टअप इंडिया आणि स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत देशाभरातील संशोधकांना विभागामधील अत्याधुनिक उपकरणांची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके देण्यात आली.

व्याख्यानमालेतून देशभरातील १४ तज्ज्ञांची व्याख्याने झाली. समारोपप्रसंगी प्र कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील, गोव्यातील प्राध्यापक सुनील भांड उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च भोपाळचे संचालक प्रा. सिवा उमापती यांनी ऑनलाईन पद्धतीने उपस्थिती दर्शवली. कार्यशाळेसाठी स्तुती टीममध्ये असणारे डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. के. डी. पवार, डॉ. मकसूद वाईकर, आदिती गर्गे, अजित कांबळे, विजया इंगळे, सुप्रिया साठे, गायत्री पवार यांना कार्यशाळा पार पाडण्यासाठी प्रा. आर. जी. सोनकवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत

## थोडक्यात महत्त्वाचे

# निवडणुकीमुळे विद्यापीठाला १४ नोव्हेंबरला सुटी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाची निवडणूक सोमवार १४ नोव्हेंबर रोजी परिक्षेत्रातील ३३ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. त्यामुळे सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संलग्नित शिक्षण संस्था व विद्यापीठातील पदव्युत्तर अधिविभागांना सुटी जाहीर केली आहे. तथापी महाविद्यालयातील शिक्षक, प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संबंधित मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे लागणार आहे. ही बाब विचारात घेऊन आणि निवडणुकीचे काम सुरळीत व्हावे यासाठी ही सुटी जाहीर केली आहे, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी परिपत्रकाव्दारे महाविद्यालये, अधिविभागांना कळविली आहे. सुटीसंदर्भातील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे.